नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२९४**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०९ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - भुषण अरूण कोलते,
वय - ३६ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - नरवेल, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. मी शेती करत असून माझी नरवेल येथे शेती गट क्र. ७३४ असून त्याचे क्षेत्र साडे चार एकर आहे. ते शेत माझ्या वडीलांच्या नावे आहे. सन २०२२ मध्ये मी माझ्या शेतात कापूस, उदीड व मुग पेरले होते. त्या शेतात २२ क्वींटल ९० किलो कापूस झाला होता. तो कापूस मी ९ हजार रूपये क्वींटलने विकला होता. तो कापूस अमीत कॉट सिन जिनींग येथे विकला होता. त्यावेळी जगन नारखेडे यांचे लोक घरी आले होते. त्यांनी पीकअप गाडी सोबत आणली होती. त्यामध्ये त्यांनी कापूस नेला. त्या कापसाची काटे पट्टी अमीत कॉट सीन येथे केली त्यावेळी मी सोबत गेलो. तेथे त्या गाडीचा काटा झाला. त्यानंतर मी अनिल फेंगडे यांना काटा पावती मागीतली. मी अनिल फेंगडे यांना आधीपासून ओळखत होतो. त्यांनी काटा पावती भेटत नाही असे सांगितले व त्याचा फोटो मला काढायला सांगितला. त्या काटापावतीवर रवी पाटील असे नाव लिहीलेले होते. त्या मी दिलेल्या कापसाकरिता चाळीस दिवसाचा करार ठरला होता. त्यामध्ये वीस दिवसानंतर अर्धे पैसे व उर्वरित रक्कम त्याच्या वीस दिवसानंतर द्यायचे ठरले होते. मला त्यातील १,०३,०५०/- रूपये मिळाले. उर्वरित रक्कम मला मिळाली नाही. त्यानंतर मी वाट बघीतली व पोलीसांकडे जबाब नोंदवला. मी जबाब नोंदवतांना शेताचा ७/१२ व काटेपावतीची छायांकित प्रत पोलीसांना दिली होती. आता मला गट क्र. ७३४ चा उतारा दाखविण्यात आला तो तोच आहे. त्यास **<u>निशाणी क्र. २९५</u>** देण्यात आला. मी अनिल जगन्नाथ फेंगडे हे माझे नातेवाईक असल्यामुळे मी त्यांना ओळखत होतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझा व्यवहार अनिल जगन्नाथ फेंगडे यांच्यासोबत झाल होता. सांक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझा व्यवहार अनिल जगन्नाथ फेंगडे व जगन्नाथ नारखेडे यांच्यासोबत झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी माझा कापसाचा माल अनिल जगन्नाथ फेंगडे यांच्या ताब्यात दिला होता. अनिल जगन्नाथ फेंगडे हे माझ्या घरी आले होते परंतु माझ्या घरी मोजमाप झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबाच्या रकाना क्र. ११ मध्ये शेतमाल घेण्याकरिता आलेल्या व्यक्तींनी सोबत महिंद्रा पीकअप मालवाहू, काटा, मनकी व हमाल लोक सोबत आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे येउन अनिल फेंगडे याने कापूस मोजमाप करून गाडीत भरला होता. ज्याच्या नावाचा कापूस आहे त्याच्या नावाचीच काटापट्टी बनत असल्याचे मी सांगू शकत नाही. साक्षीदार परत सांगतो की, मला माहीती नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी मी काटेपट्टीची मागणी केली होती असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे.

०३. मला वीस दिवसानंतर पैसे न मिळाल्यामुळे मी कोणालाही नोटीस दिली नव्हती. मी पोलीस स्टेशनला सदर घटनेबाबत फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणताही कापूस दिला नसल्यामुळे माझ्या नावाने काटा पट्टी उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा सांगत आहे व मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. मी आरोपी क्र. २ ते १४ यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ते १४ यांचा माझ्या व्यवहाराशी काहीही संबंध नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१२. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.08.26 16:15:48 +0530

दिनांक : २६/०८/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर